

# त्यांनी स्त्रीमुक्तीला जन्म दिला !

## डॉ. नीलम गोऱ्हे

पारंपारिक वैदिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या लग्नात कन्यादान, पाय धुणे इ. स्त्रियांसाठी मानहानीकारक उपचार आहेत. त्यामुळे लग्नाचे आमंत्रण आले की तेथे सामील न होण्याकडेच नेहमी प्रवृत्ती झुकते. आणि कार्यकर्ते मंडळींना रजिस्टर्ड विवाह हाच मार्ग आवडतो आणि योग्य वाटतो. असं असलं तरीही विशेषत: आंतरजातीय लग्नांमध्ये घरामधून दडपण आणून इतर-सुद्धा काही अडचणी निर्माण केल्या जातात.

हरिश्चंद्र सूडे आणि सविता वायदंडे या दोघांची प्रेमाताई गोरे यांचेकडे ओळख झाली. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण पूर्ण केले आहे व लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे असे कळाले. आंतरजातीय विवाह असल्याने घरातले लोक लग्नाला येणार नाहीत परंतु काही प्रमाणात लग्न अडवायचा पण प्रयत्न करत आहेत असे सांगून आमच्या आयुष्यातील या आनंदाच्या प्रसंगी सगळे मित्र मैत्रिणी हेच आमचे कुटुंब आहेत असं सूडे म्हणाले. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने दोघांचेही स्नेही तसेच इतर काही कार्यकर्ते एकतीस मे च्या सुमारास पुण्यात येणार होते त्याला जोडूनच लग्नाचा दिवस ठरवला होता.

सविताची वयासंबंधीची सर्टीफिकेटस् गावाकडून वेळेवर न आल्याने नोटीस देता आली नाही. अशावेळी लग्न पुढे ढकलणे वगैरे प्रश्न उभे राहिले. 'बायजा 'च्या एप्रिल–मे अंकात सत्यशोधक पद्धतीने करण्याच्या विवाहाची अर्थपूर्ण मंगलाष्टके प्रसिद्ध झाली होती. पुन्हा काही विचारांना त्यानिमित्ताने उजाळा मिळाला होता. मग प्रत्यक्षात सत्यशोधक पद्धतीनेच हा विवाह करण्यास काय हरकत आहे ? असा विचार मनात आला. सविता आणि सूडे यांच्याशी चर्चा केल्यावर तो अजूनच दृढमूळ होऊ लागला. या विवाहाची कायद्याची बाजू पण माहिती करून घ्यावी म्हणून लॉ कॉलेजचे प्राचार्य सत्यरंजन साठे यांना भेटलो.

त्यांनी असे सांगितले की कायदेशीर दृष्टया अंतरपाट इ. आवश्यक नाहीत. लग्नाच्यावेळी घालण्यात येणाऱ्या सात फेऱ्या व त्या पाहणारे काही साक्षीदार पुरेसे असतात. लग्ननिमंत्रण पत्रिका हा मुद्दा कायद्याने लग्न नोंदविण्यास पुरेसा पुरावा असतो. त्याचवेळी सत्यशोधक पद्धतीची मंगलाष्टके म्हटली तरी लग्न कायदेशीर ठरेल.

साठेसरांच्या या सल्ल्यानंतर लग्न याच पद्धतीने करण्याचे त्या दोघांनी ठरवले.

नंतर ३१ मे रोजी संध्याकाळी ५॥ वाजता साने-गुरुजी स्मारक, पवती पायथा, पुणे येथे सविता वायदंडे आणि हरिश्चंद्र सूडे यांनी लग्न केले. लग्नात म. फुले रचित मंगलाष्टके डॉ. नीलम गोऱ्हे आणि वसुधा सरदार यांनी सांगितली. प्रारंभी लग्नाचा इतिहास, कायदेशीर बाजू याची माहिती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितली. लग्नाला ३५।४० स्त्रीपुरुष उपस्थित होते. उपस्थितात श्री यदुनाथजी थत्ते, श्री. विलास वाघ प्रभृती पण उपस्थित होते.

स्वातंत्र्यानुभावाचि ओळख आम्हा झाली
नसे मानसी
यासाठी अधिकार देशिल स्त्रिया
घे आण त्याची अशी

या ओळींना सगळ्यांनी दाद दिली.

सविता आणि हरिश्चंद्र सूडे यांनी विचारांना कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. पुष्कळ वर्षांनी या विवाहपद्धतीचे पुनरुज्जीवन झाले असेल. म. फुल्यांनी फक्त शाळाच उघडून स्त्रीमुक्तीला जन्म दिला असे नाही तर जीवनाच्या प्रत्येक अंगाबाबात पुरोगामी पर्यायांना जन्म दिला !

तेथील उपस्थितांनी हरिश्चंद्र सूडे आणि सविता वायदंडे यांना शुभेच्छा दिल्या. बायजाच्या वाचकांनी पण द्याव्यात आणि शक्य तिथे ही पद्धती कृतीत आणण्याचा यत्न करावा !